## इतिहास संशोधक

# डॉ. अनिल कठारे

## गौरव ग्रंथ




: संपादक :

डॉ. शिवाजी गाढे
डॉ. वसंत कदम
डॉ. सुरेश नांदे




शिवानी प्रकाशन

माळवाडी हडपसर, पुणे

ISBN 978-93-85426-51-3

9 789385 426513

इतिहास संशोधक

# डॉ. अनिल कठारे

## गौरव ग्रंथ

**संपादक**

डॉ. शिवाजी गाढे

डॉ. वसंत कदम

डॉ. सुरेश नांदे

**सहसंपादक**

डॉ. संजय गिरे

डॉ. किशन केंद्रे

डॉ. रमेश गंगथडे

डॉ. जयश्री घोडके

डॉ. महादेव वाघमारे

डॉ. दिनकर रणदिवे

Presented by
Dr. Kathare Anil
Professor & Head
P.G. Dept. of History & Research Centre
Shri Shivaji College, Kandhar
Dist. Nanded-431714

शिवानी प्रकाशन

शिवानी प्रकाशन, पुणे

ITIHAS SANSHODHAK DR. ANIL KATHARE
GOURAV GRANTH

© इतिहास संशोधक डॉ. अनिल कठारे गौरव ग्रंथ समिती, कंधार

प्रथम आवृत्ती - १ मे २०२०
प्रतींची संख्या - १००

**प्रकाशक**
विजय टेकवार
शिवानी प्रकाशन
माळवाडी, हडपसर, पुणे.

**अक्षर जुळवणी व मुखपृष्ठ**
संतोष जाधव
संस्कृती ग्राफिक्स,
संभाजी चौक, सिडको नविन नांदेड.

**मुद्रणालय**
आर्टी ऑफसेट, लातूर

**किंमत - रू. १०००/-**

**ISBN : 978-93-85426-51-3**

प्रस्तुत ग्रंथात लेखकांनी मांडलेली मते ही त्यांची स्वतंत्र मते आहेत. लेखकांनी त्यांच्या लेखात मांडलेल्या मताशी संपादक, सहसंपादक, मुद्रक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. तसेच लेखात मांडलेल्या मजकूराशी संपादक, सहसंपादक, मुद्रक व प्रकाशक यांचा संबंध नाही.

All disputs are subject to Kandhar Jurisdiction Only

# अनुक्रमणिका


१) **आदर्श पती** ........................................ २१
सौ. रमा अनिल कठारे, कंधार

२) **माझे पप्पा** ........................................ ३०
सौ. पुनम प्रशांत गायकवाड-कठारे, पुणे

३) **माझे आदर्श पप्पा** ........................................ ३२
डॉ. पायल अनिल कठारे, कंधार

४) **पूर्वचरित्र** ........................................ ३५
डॉ. गंगथडे रमेश दत्तात्रय, अहमदपूर

५) **आठवणीचे तरंग** ........................................ ५२
डॉ. सावंत दिलीप साहेबराव, कंधार

६) **आंबेडकरी चळवळीतील योगदान** ........................ ६४
डॉ. चाटे अपर्णा पांडूरंग, कंधार

७) **राजकारण व समाजकारण** ........................................ ७७
डॉ. गिरे संजय भाऊराव, नांदेड

८) **इतिहास परिषद, चर्चासत्र व कार्यशाळा** ................ ८९
डॉ. साखरे विजया खुशालराव, कंधार

९) **शोध प्रबंधाचा विषय व्हावा एवढ्या संघटन लेखन ..... १०६
कर्तृत्वाचे इतिहासकार**
डॉ. जगताप परबतराव दौलतराव, जळगाव

१०) **इतिहास संशोधक डॉ. अनिल कठारे नावाचे झंझावत** .. ११०
डॉ. कापसे दिगांबर दत्तात्रय, लाखनी

११) **डॉ. अनिल कठारे यांचे कार्य व इतिहास संशोधन
पध्दती** ........................................ ११४
डॉ. डोंगरे वसंत राघोजी, खामगाव

१२) **प्रतिभा संपन्न इतिहास संशोधक** ........................ १२३
डॉ. वाघ दत्तात्रय नामदेव, अमळनेर

१३) **मित्रवर्य डॉ. अनिल कठारे** ........................................ १२५
डॉ. देशमुख गोविंद, हैदराबाद

१४) **स्थानिक इतिहास संशोधन व लेखन** ........................ १२७
डॉ. चाटे अपर्णा पांडूरंग, कंधार

१५) **थोर व वस्तुनिष्ठ इतिहास संशोधक** ........................ १३५
डॉ. कोंडेकर राजू शिवाजी, मुदखेड

१६) **इतिहास तज्ञ डॉ. अनिल कठारे यांचे सर्वस्पर्शी इतिहास लेखन**.................................................. १४४
डॉ. चाटे अपर्णा पांडूरंग, कंधार

→ १७) **आदर्श व्यक्तिमत्व व संघर्षमय प्रवास** .................... १५२
डॉ. इंगळे संगपाल प्रकाश, हिमायतनगर

१८) **एक कल्पक व्यक्तिमत्व** ........................................ १५६
डॉ. वडजे जयराज पांडुरंग, मुखेड

१९) **तळमळीने मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक** .................. १५९
मगरे उषाताई लक्ष्मण, पूर्णा

२०) **आदर्शाचे दीपस्तंभ** .............................................. १६२
डॉ. घोडके जयश्री महाळप्पा, नळदूर्ग

२१) **वंचित - उपेक्षित इतिहास लेखन** ............................ १६६
डॉ. गंगथडे रमेश दत्तात्रय, अहमदपूर

२२) **इतिहासातील सूर्य** ................................................ १७५
सोनकांबळे प्रभाकर एस., लोहा

२३) **ज्ञानाचा अखंड झरा** .............................................. १७७
डॉ. दिग्रसकर अंजली सखाराम, नांदेड

२४) **संशोधक डॉ. अनिल कठारे आणि इतिहास** ............... १८०
डॉ. कुलकर्णी विजय पांडूरंगराव, देगलूर

२५) **मराठ्यांच्या इतिहासाचे अभ्यासक व त्यांचा सहवास**.... १८५
डॉ. कदम वसंत व्यंकटराव, हिमायतनगर

२६) **डॉ. अनिल कठारे : एक संघर्षशील व्यक्तिमत्व** ......... १९१
डॉ. कांबळे राजकुमार संतराम, लातूर

२७) **गुरूमित्र डॉ. अनिल कठारे** ...................................... १९४
डॉ. वाघमारे महादेव भानुदास, जुन्नर

२८) **प्रोफेसर डॉ. अनिल कठारे यांच्या सहवासात** ............ २००
डॉ. केंद्रे किशन चुडामन, सोनखेड

# १७ आदर्श व्यक्तिमत्व व संघर्षमय प्रवास

आदरणीय प्रा.डॉ. अनिल कठारे हे माझे सासरे तसेच माझे आदर्श आहेत. व्यवसायाने त्यांच्याप्रमाणे मी पण प्राध्यापक असल्याने त्यांना आदर्श ठेवून त्यांच्याप्रमाणेच कारकीर्द करू इच्छितो. त्यांची कारकीर्द फार प्रदीर्घ असुन आजवर असंख्य (१००) पुस्तके त्यांनी प्रकाशित केली आहेत व ती प्रख्यात आहेत. त्यांच्या घरात इतर सामानापेक्षा पुस्तकांनी जागा जास्त व्यापुन टाकलेली आहे. ज्याप्रमाणे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुस्तकांसाठी घर बांधले त्याचप्रमाणे मामांनी (कठारे सर) सुध्दा पुस्तकासाठीच घर बांधलेले आहे, असे म्हटले तर वावगं ठरणार नाही. त्यांच्या सहवासातील अनुभवावरुन सांगु इच्छितो की, ते फक्त प्राध्यापक म्हणुनच आदर्श नाहीत तर एक उत्तम नागरिक म्हणुन सुध्दा आदर्श आहेत. ते जात-पात न मानता माणुसकीच्या धर्माला महत्त्व देतात, पण प्राध्यापक असल्याने वर्गात मुलांना त्यांना इतिहास (भारतातील जाती-पातींचा संघर्ष) हा सांगावाच लागतो. त्यामुळेइतिहासाचा संदर्भ व आजचे जातींचे राजकारण यांमुळे विद्यार्थी सुध्दा त्याचे बळीस पडताना दिसतात. त्यामुळे ते जातीच्या इतिहाससोबत महामानवांनी जो माणुसकीचा धर्म सांगितलेला आहे तो विद्यार्थ्यांना पटवुन देतात, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये ते माणुसकीचे बीज रोवले जाईल असे ते नेहमी मला घरात चर्चा करताना सांगतात व मी सुध्दा त्यांच्याप्रमाणेच विद्यार्थ्यांमध्ये ते माणुसकीचे बीज रोवण्याचा प्रयत्न करतो.

मामांना तिनही मुली आहेत, मुलगा नाहीये. दिनांक ०२/०९/२००७ रोजी मुंडे हॉस्पीटल श्रीनगर, नांदेड येथे त्यांना चौथे अपत्य मुलगा झाला होता, परंतु एका तासांत ते बाळ मृत पावले. पत्नीचे सीझर झाले होते व तब्येतही खुप खालावलेली होती. दोघांनाही खुप मोठा धक्का बसला होता. परंतु पत्नीला सावरण्यासाठी त्यांनी स्वतःला खंबीर केले व लगेच काही दिवसात म्हणजे दिनांक २७/०९/२००७ रोजी टाटा मोटर्स कंपनीची मामांनी इंडिका नोंदणी क्रमांक एम.एच. २६ एस. ८०३ कार खरेदी केली. परिवाराला दुःखाच्या सावटातुन बाहेर खेचण्याचा त्यांचा हा एक छोटासा प्रयत्न! परिवाराला दुःखातुन बाहेर काढण्यासाठी त्यांनी खुप प्रयत्न केले. पण तशीच साथ त्यांना त्यांच्या पत्नीचीही (सौ. रमा कठारे) लाभली. मामींचे पण शिक्षण एम.ए. इतिहास झाले असुन त्याही मामांप्रमाणेच विद्वान व हुशार आहेत. त्या समाज कार्यकर्त्या व राजकारणी व्यक्तिमत्त्वाच्या आहेत. मामांच्या यशामध्ये मामींचे खुप मोठे योगदान आहे. एकंदरीत दोघांचेही शिक्षणक्षेत्र व समाजकार्य यामध्ये दीर्घ व मोलाचे योगदान

असल्याने शिक्षणक्षेत्रात व समाजात त्यांना मानाचे स्थान खुप मोठे आहे. मुळात मुलांमुलींमध्ये ते भेद करीत नाहीत व मुलगा नाही याचे त्यांना दुःख आहे असे मला कधीच जाणवले नाही. उलट मुलगा असणाऱ्यांपेक्षा त्यांचे तीन मुली असलेले कुटूंब जास्त सुखी दिसते. ही समाजासाठी आदर्शयुक्त गोष्ट आहे.

मामांचा खुप महत्त्वाचा गुण म्हणजे दुःख व आजार कितीही मोठे असले तरी त्याचा कामामध्ये अडथळा निर्माण होवू देत नाहीत. आजच्या ५५ वर्षे वयामध्ये सुध्दा ते रोज सकाळी ५ वाजता उठुन व्यायामाला जातात, नंतर थंड पाण्याने आंघोळ करतात. थंड पाण्याने आंघोळ करणे हे मला तर कधीच शक्य नाही. मामांचा रविवारचा नित्यक्रम म्हणजे आंघोळीनंतर अल्पसा आहार घेतल्यानंतर लगेचच अभ्यासाला-लिखाणाला बसतात. दुपारी जेवल्यानंतर परत लिखानाला बसतात, नंतर संध्याकाळी फिरायला जाणार व रात्रीचे जेवण होईपर्यंत परत लिखान कार्य सुरू करतात. रात्रीचे जेवण कुटूंबासोबत करीत त्यांच्यासोबत बोलत बसतात, व परत एक ते दोन तास लिखान कार्य करतात. इतर कार्यालयीन दिवशी दुपारी कॉलेजवरून घरी आल्यावर जेवण करून परत आपल्या लिखान कार्याला बसतात. त्यासोबत कौटुंबिक कामे पूर्ण करून कौटुंबिक जबाबदारी सुध्दा पार पाडतात. त्यांना T.V. चालु करता येत नाही व मोबाईल सुध्दा योग्यरित्या हाताळता येत नाही. आजची मुले - मुली मात्र T.V. व मोबाईल मध्ये मग्न होवून त्यांच्या व्यसनाधीन झालेली आहेत असे ते मला नेहमी म्हणतात व त्यांच्या करिअर विषयी मामांना खुप मोठा प्रश्न निर्माण होतो.

आजच्या तरूणांना भौतिक व इतर सुविधा खुप आहेत व पालकही शिक्षणाविषयी जागरूक आहेत. मामा आपल्या पाल्यांना व विद्यार्थ्यांना काम न सांगण्याचा किंवा बाहेर काम न करण्याचा सल्ला देवून अभ्यासावर लक्ष देण्यास सांगतात व स्वतः त्यांच्यासाठी अपार कष्ट घेतात, त्यांच्या शिक्षणासाठी धडपड करतात. शिक्षणाला महत्त्व द्यायचं, काम तर आयुष्यभर करायचच आहे, हेच वय आहे काहीतरी करून दाखवायचं असे ते नेहमी म्हणतात. आजच्या तरूणांना मामा आदर्श आहेत, कारण त्यांची घरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना काम करत करत शिक्षण पूर्ण करावे लागले.

औरंगाबादला मिलिंद कला महाविद्यालयात बी.ए. प्रथम वर्षाला असताना मामा व त्यांचे चुलत मोठे बंधु सुनिल कठारे ( त्यांचे एम.एस. डब्ल्यू. सुरू होते. ) हे दोघेही सरदारजींच्या पंजाब रेस्टॉरन्ट रेल्वे स्टेशन औरंगाबाद येथे वेटर म्हणून काम करीत होते. मामा, सुनिल कठारे व शेख इमाम हे तिघे सेन्ट्रल बसस्टॅन्ड जवळील कोतवालपूरा औरंगाबाद येथे किरायाने रूम करून राहत होते. ते तेथून सायकलने

मिलिंद कॉलेजला ये-जा करीत होते. नंतर कामासाठी पंजाब रेस्टॉरन्टला जाणे व रात्री परत घरी येणे असा त्यांचा नित्यक्रम होता व मिळेल तसा वेळ काढून ते अभ्यास करीत होते. अभ्यासाकडे मात्र त्यांनी कधी दुर्लक्ष होवू दिले नाही. एके रात्री रेस्टॉरन्ट मधील काम आटोपल्यानंतर सर्व चिकन लेग पीस सरदारजींनी त्यांना फ्रिजमध्ये ठेवायला सांगितले व ते करींत असता मामा व त्यांचे बंधुनी त्यातील दोन लेग पीस खाल्ले. दुसऱ्या दिवशी सरदारजींनी दोघांनाही बोलावून ते फ्रीजमधील लेग पीस मोजायला सांगितले व त्यानंतर लगेच दोघांनाही एक एक चापट लगावली. मामांना मात्र कळाले की सरदारजी रोज लेग पीस मोजल्यानंतर आपल्याला ते फ्रिजमध्ये ठेवायला सांगतात. त्यानंतर मात्र सरदारजींनी दोघांची जोडी फोडून मामांना त्यांच्या घरकामासाठी (साफसफाई, फर्शी पुसणे इत्यादी साठी ) ठेवले. त्यांची एक मांजर होती व तिच्या जेवणाची जबाबदारी सुध्दा मामाकडेच होती. एकदा सरदारजींनी मामांकडे मांजरीला जेवणासाठी डिलक्स ब्रेड दिले असता त्यातील बहुतांश ब्रेड हे भूक लागल्यामुळे मामांनीच खाल्ले, पण ब्रेड खाल्ल्यानंतरही मांजर आवाज का करीत आहे ? असा प्रश्न सरदारजींना पडला असता, त्यांना शंका आली व त्यांनी मामांना जोराची लाथ मारली व त्यांच्या मनात अविश्वास निर्माण झाल्याने त्यांनी मामांना कामावरून काढून टाकले. त्यानंतर मामांनी सायकल पंक्चरचे दुकान सुरू केले. दरवर्षी उन्हाळ्यात मामा त्यांच्या मोठ्या बंधु सोबत ( सुनिल कठारे) छावणी कॉर्नर जवळील मिलिंद मल्टीपर्पज हायस्कूल समोरील वडाच्या झाडाखाली आपले दुकान थाटत होते. मामा छोटे असल्यामुळे सर्वच काम त्यांनाच करावे लागत होते. अशा प्रकारे जीवनासाठी व शिक्षणासाठी मामांचा संघर्ष सुरू होता. मामांचा हा संघर्ष मिलिंद कॉलेजमधील इतिहासाचे प्राध्यापक आनंद के. मोरे यांच्या नजरेसमोर होता. प्रा. मोरे सर म्हणजे एक सज्जन व माणुसकी जपणारे होते. ते गरिब व होतकरू विद्यार्थ्यांना मदत करीत असत. त्यांच्या तीन आश्रमशाळा होत्या व त्यांचे मुख्य ऑफिस हे औरंगाबादमधील कोतवालपूरा येथील त्यांच्या राहत्या घरीच होते. ते गरिब व होतकरू विद्यार्थ्यांना ऑफिसच्या लिखाणकामासाठी बोलवायचे व महिना ६० रूपये द्यायचे. त्यात मामांचा समावेश होता. मामांची शिक्षणासाठीची धडपड व त्यासाठी काम करण्याचा संघर्ष हा स्वभाव मोरे सरांना भावला. मामांचा जीवनप्रवास हा बाबासाहेबांनी दिलेल्या मुलमंत्राची अंमलबजावणी करणारा आहे, तो म्हणजे 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा'

सध्या मामांना मणक्याचा त्रास असून त्या स्थितीमध्ये सुध्दा त्यांनी २१ मार्च २०१९ रोजी 'आधुनिक भारताचा इतिहास ( इ.स. १६०० ते इ.स. १९८६ ) हे ५६

घटक असलेले ९४० पानांचे पुस्तक प्रकाशित केले. १९ डिसेंबर २०१८ रोजी मणक्याच्या आजारामुळे त्यांच्या मानेतील नस दबली होती. त्यामुळे त्यांचा उजवा हात व पाय बधीर होऊ लागला होता. अशावेळी नांदेड येथील धोंडे हॉस्पिटल प्रथम उपचार घेतला. पुढे लातूर येथे दाखविले. यानंतर भगवती हॉस्पिटल नांदेड व यशोसाई हॉस्पिटल नांदेड व उदय ओमनी हॉस्पिटल हैदराबाद येथे उपचार घेतला. डॉ. धोंडे, लातूरचे डॉ. देवाशिष रूईकर व भगवती हॉस्पिटलचे डॉ. गोविंद शिंदे यांनी ऑपरेशनाचा सल्ला दिला होता. यशोसाई हॉस्पिटलचे डॉ. ऋतुराज जाधव व हैदराबादचे डॉ. राघव दत्त मुलकुतला यांनी योग्य उपचार केला. डॉ. राघव दत्त यांनी फिजीओ थेरपीचा सल्ला देऊन नांदेडच्या डॉ. राजेंद्र पाटील यांचे नाव सुचविले. त्यानुसार डॉ. राजेंद्र पाटील यांनी फिजीओ थेरपी केली व मामांची प्रकृती चांगली झाली. ते या मणक्याच्या त्रासातून लवकरच सावरतील व त्यांच्या 'Healt is wealth' या म्हणीनुसार त्यांना उत्तम आरोग्य लाभो हीच बुध्दचरणी प्रार्थना करतो. कारण इतर सर्व गोष्टी त्यांनी स्वकर्तृत्वावर मिळविलेल्या आहेतच. अशा महान व्यक्तिशी माझं नातं जुळलं गेलं ते म्हणजे माझे आदरणीय प्रा. डॉ. वसंत कदम सर ( इतिहास विभाग प्रमुख. हु.ज.पा. महाविद्यालय, हिमायतनगर ) यांच्यामुळे मला मा. प्रा. डॉ. वसंत कदम सर व मा. प्राचार्या डॉ. उज्वला सदावर्ते मॅम यांचे सहकार्य वेळोवेळी लाभले. त्यामुळे त्यांचेही मी आभार मानतो.

**डॉ. इंगळे संगपाल प्रकाश**
वाणिज्य विभाग
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर जि. नांदेड